‘मराठवाड्यातील निवडक लेखिकांच्या कथासंग्रहात आलेल्या स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास '

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत
मराठी या विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) संशोधन आराखडा.

संशोधक

सोनवणे सुलक्षणा ज्ञानदेव

एम.ए.(मराठी), सेट, एम.एड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुनीता सांगोले

एम.ए.(मराठी),सेट,पीएच.डी.

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

संशोधन केंद्र

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

जुलै २०२१

भूमिका :

स्त्री ही सृष्टीच्या संपूर्ण निर्मिती-उत्थान-विकास प्रक्रियेला चालना देणारी समाजातील एक महत्त्वपूर्ण असा घटक आहे. या 'स्त्री'विषयी अनेक साहित्यिकांनी वर्षानुवर्षे विभिन्न प्रकारच्या साहित्याची निर्मिती केलेली आहे. मराठी साहित्यात स्त्रीवादी लेखनाची मूळ प्रेरणा हीच 'स्त्री' असल्याचे दिसून येते. स्त्री या विषयाभोवती कविता, कथा, कादंबऱ्या व नाटक आदींमधून लेखन झालेले आहे. अशा सृष्टीच्या उत्क्रांतीतील महत्त्वपूर्ण घटक असलेल्या स्त्रीबद्दल तिच्या मनोव्यापाराबद्दल संशोधनकर्त्याला असलेल्या उत्सुकतेतून व जिज्ञासेतून हा विषय त्याने संशोधनाकरिता निवडला. प्राचीन काळापासूनच स्त्री ही संपूर्ण जगाची माय, माता, जननी, जन्मदात्री असूनही तिच्या वाट्याला फक्त उपेक्षाच येते. याउलट पुरुष, पुरुषी पराक्रम, पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्था यांचा समाज उदोउदो करताना आढळतो. अशाप्रकारे स्त्री व पुरुष यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा का आहे? असा प्रश्न संशोधनकर्त्याला पडला. याचा संशोधनात्मक दृष्टीने शोध घ्यावा या हेतूने संशोधनकर्त्याने उपरोक्त विषय संशोधनासाठी निवडला.

स्त्री आणि स्त्री स्वातंत्र्य हे एकूणच जीवनाचे प्रमुख अंग असूनही त्या दोहोंकडेही दुर्लक्ष होत आहे. आणि अर्थातच हे काम करावयास कोणीही धजावत नाही. स्त्रीकडे पाहण्याचा राज्यकर्त्यांचा, प्रशासकांचा, नागरजनांचा, तसेच खुद्द कुटुंबातील स्त्रियांचा दृष्टीकोन कसा असावा याचा शोध घ्यावा म्हणून संशोधनकर्त्याला या विषयावर संशोधन करण्याची इच्छा निर्माण झाली. त्याचबरोबर मुलगी, आई, बहीण, बायको, मामी, काकू, आजी, आत्या या सर्व नात्यांना न्याय देणाऱ्या, लग्न झाले की एका क्षणात ज्या घरी लहानाचे मोठे झालो ते घर सोडून एका परक्या घराला, घरातील सर्व माणसांना आपल्या स्वभावाने जीव लावून, आपलेसे करणाऱ्या, बालविवाह, विधवापण, विविध प्रकारचे छळ, जुलूम, जाच, अपमान या सर्व संकटांवर आपल्या तीव्र इच्छाशक्तीने मात करणाऱ्या, स्त्रीच्या 'स्त्री' म्हणून असणाऱ्या भावनांचा समजुतींचा, भावनात्मक गुंतवणुकीचा अन्वयार्थ लावून स्त्री संबंधीच्या विविध विचारप्रणालीमागचे मूळ शोधण्यासाठी मला हा अभ्यास करणे गरजेचे भासले.

प्रस्तुत विषयासंदर्भात मी आदरणीय मार्गदर्शक प्रा.डॉ. सांगोले यांच्याशी चर्चा केली असता त्यांनीही या विषयास संमती दिली. त्यामुळे मराठवाड्यातील स्त्री कथाकारांच्या कथासंग्रहाची जुळवाजुळव करून त्याचे वाचन केले आणि संशोधनाची रूपरेषा तयार केली.

प्रास्ताविक :

मराठी साहित्याची परंपरा फार जुनी व प्रदीर्घ आहे. या मराठी साहित्यविश्वात कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, ललित गद्‌य या प्रमुख साहित्यप्रकारांसमवेत कथा या प्रमुख साहित्यप्रकाराचा समावेश होतो. त्यामुळे मराठी साहित्याचे दालन समृद्ध झाले आहे. कथेला आज एक प्रमुख साहित्यप्रकार म्हणून जागतिक मान्यता व लोकप्रियता लाभलेली असली तरी तिचा विकास प्रथमतः वेदकाळात झाला.ऋगवेदातील यम-यमीसारख्या कथा यांचे उत्तम उदाहरण होत. हंसकाकीय आख्यानासारख्या कितीतरी वाङ्मयातील जातककथा, प्राचीन साहित्यातील बृहत्कथासार, कथाकल्पद्रुम, वेतालपंचविशंती यांसारख्या कथासंग्रहामध्ये अनेक कथा आढळतात.

मराठी कथेने वेगवेगळ्या विषयाच्या आणि आशयाच्या द्‌वारे चौकसपणे वाटा चोखाळल्या आहेत. कार्यकारण श्रंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्‌वारा मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन कथेतून घडविले जाते. कथा हा वाङ्मय प्रकार समाजाचा दस्तऐवज व मानवी जीवनाचा आरसा प्रकट करण्याचे महत्त्वपूर्ण साधन असल्यामुळे समाजजीवनात कथा या साहित्य प्रकाराला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

मराठी कथेचे स्वरूप संमिश्र असून या साहित्यप्रकारात कथानक, व्यक्तिचित्रण, घटना, प्रसंग, वातावरण निर्मिती, संवाद, भाषाशैली इत्यादी घटकांचा समावेश होतो कथा हा साहित्यप्रकार काळानुरूप बदललेला असला तरी त्या त्या काळानुरूप समाजजीवनाचे चित्रण त्या कथेत उमटलेले आहे.

मराठी कथेचा सुरुवातीपासूनचा इतिहास लक्षात घेतला तर रंजनवादी, कलावादी, जीवनवादी, समन्वयवादी, व्यावसायिक, नैतिकवादी अशा विविध परंपरा असल्याचे दिसून येते तसेच मराठी कथेच्या वास्तववादी, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, कल्पनात्मक, प्रश्नात्मक, प्रचारकी, ग्रामीण, प्रादेशिक, मनोविश्लेषणात्मक, पौराणिक कथा या विविध प्रकारच्या कथांतून समाजजीवनातील वेगवेगळे विषय हाताळले गेले. त्यात स्त्रियांचे जीवन हा विषय समर्थपणे मांडला गेला आहे.

स्त्री जीवन हा स्त्रीवादी लेखकांचा जिव्हाळ्याचा विषय आहे त्याचे चित्रण अनेक कथाकारांनी केले आहे. स्त्रियांच्या विचारशैलीचे, भोळेपणाचे, व्यक्तिमत्त्वाचे धागेदोरे चौकसपणे धुंडाळले आहेत. स्त्री जीवन हे आई-वडील, बहिण-भाऊ, नवरा, सासू-सासरे, ननंद-दीर, जावा, शेजारणी, मित्र-मैत्रिणी अशा अनेक नात्यांशी जोडले गेलेले आहे. या सर्व घटकांचे यथार्थवादी

वर्णन कथांमध्ये आढळते. त्यात स्त्रियांचा आनंद, दुःख, त्यांची कैचीत सापडले जाण्याची भावना, कुटुंब व समाज यांच्याकडून होणारे त्यांचे शोषण आणि समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आदी स्पष्ट केले आहे. तद्नुषंगाने या काही निवडक कथासंग्रहांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येईल.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :

१) मराठी कथेतून प्रगट होणाऱ्या स्त्रियांचे जीवनानुभव व संघर्ष इ.चा शोध घेणे.

२) प्रस्तुत कथांच्या आधारे स्त्रियांच्या भावनिक, मानसिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन काय आहे, याचा कथांमार्फत शोध घेणे.

४) स्त्री जीवनात वडील, भाऊ, नवरा, मुलगा या नातेसंबंधांचा शोध घेणे.

५) कथेतून स्त्री जीवनातील आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण व भवितव्य इ.चा वेध घेणे.

६) स्त्रियांच्या सकारात्मक व नकारात्मक बाजूंच्या वर्णनातून त्यांच्या समस्यांचा अचूक वेध घेणे.

७) स्त्रीविषयक कथासंग्रहाची भाषाशैली, बोलीभाषेतील वैविध्य, अपभ्रंश भाषा यातील वेगळेपणाचा शोध घेणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधप्रबंधात स्त्रियांचे जीवनचित्रण करत असताना स्त्रियांच्या जीवनावर आधारित लिहिल्या गेलेल्या अनेक कथासंग्रहांचा आधार घेतला जाईल. ग्रंथालय संशोधन पद्धतीच्या आधारे संशोधन केले जाईल. मराठी कथेत स्त्रियांच्या जीवन चित्रणावर प्रकाशित झालेले वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, दिवाळी अंक, साप्ताहिके आणि इतर साहित्याचा वापर करून संशोधन केले जाईल. लिखित साधनांच्या वापरामध्ये स्त्रियांचे चित्रण करणाऱ्या कथांवरील विविध समीक्षणे, परीक्षणे आणि गरज भासल्यास प्रत्यक्ष संवादातून संशोधन पूर्ण केले जाईल.

संशोधन विषयाची सामुग्री :

‘मराठवाड्यातील निवडक स्त्री लेखिकांच्या कथासंग्रहात आलेल्या स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास' या विषयावरील संशोधनासाठी मराठवाड्यातील काही निवडक लेखिकांच्या कथासंग्रहाची निवड केली आहे. संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी विविध समीक्षा ग्रंथ,

वैचारिक मासिके, वृत्तपत्रे, लेख इत्यादींचा आधार घेतला जाईल. एकंदरीत संशोधन कार्य वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध प्रकारे पूर्ण करण्यासाठी आवश्यक सर्व साधनसामुग्रीचा वापर प्रस्तुत शोधनिबंधात केला जाईल.

संशोधन विषयाचे वेगळेपण :

संशोधन कार्याचा विचार करू पाहता कोणत्याही विषयावर केलेले संशोधन परिपूर्ण नसते. त्यामुळे संशोधन परिणामकारकरित्या पूर्ण करणे गरजेचे असते. प्रस्तुत शोध प्रबंधात स्त्रियांच्या जीवनाचे वास्तव, त्यांचे समाजातील स्थान महत्त्व आणि भवितव्य यांचा शोध घेतला जाईल. स्त्रियांचे वास्तव जगणे समजून घेण्याचा प्रयत्न या प्रबंधातून केला जाईल.

संशोधन विषयाचे महत्त्व :

संशोधन म्हणजे सत्यशोधनाकडे नेणारा वैचारिक मार्ग संशोधनामुळे विषयाची सखोल माहिती जाणून घेणे शक्य होते. प्रस्तुत विषयावरील संशोधनाबाबत बोलावयाचे झाल्यास, स्त्री हा कुटुंबाचा कणा आहे. स्त्री व स्त्री-स्वातंत्र्य हे राष्ट्राचे बलस्थान आहे अशा स्त्रियांची सध्या काय स्थिती आहे ? त्यांचे मनोविश्व कसे आहे ? हे या संशोधनातून जाणून घेता येईल. त्याचबरोबर साहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्रियांच्या अडचणी, व्यथा-वेदना,टाहो या सर्वांवरील उपाय यांचा सखोल अभ्यास करणे सोपे होईल. या अनेक कारणांमुळे या संशोधनाचे महत्त्व कालातीत आहे.

संशोधन विषयाच्या मर्यादा:

संशोधन विषयाला निश्चित स्वरूपाची मर्यादा असणे आवश्यक असते. संशोधनाला मर्यादा नसतील तर संशोधक मूळ संशोधन कार्यापासून भटकत असतो. त्यामुळे संशोधनाचा मुख्य हेतू सफल होत नाही. मराठवाड्यात अनेक लेखिका व त्यांचे अनेक कथासंग्रह आहेत. परंतु फक्त ललिता गादगे, रेखा बैजल, छाया महाजन, अनुराधा वैद्य व मथु सावंत या कथा लेखिकांच्याच कथासंग्रहात चित्रित स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास ही या संशोधन विषयाची मर्यादा आहे.

‘मराठवाड्यातील निवडक लेखिकांच्या कथासंग्रहात आलेल्या स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास'

संशोधनासाठी प्रकरणनिहाय विभागणी

<u>प्रकरण पहिले</u>

मराठवाड्यातील स्त्रीलिखित मराठी कथा: एक आढावा

<u>प्रकरण दुसरे</u>

मराठवाड्यातील लेखिकांचा व्यक्तित्त्व-वेध

<u>प्रकरण तिसरे</u>

मराठवाड्यातील लेखिकांच्या कथेतील अनुभवविश्व

<u>प्रकरण चौथे</u>

मराठवाड्यातील लेखिकांच्या कथालेखनातून प्रतिबिंबीत स्त्रियांच्या जीवन: संघर्षाचे स्वरूप, समस्या आणि उपाययोजना.

<u>प्रकरण पाचवे</u>

मराठवाड्यातील लेखिकांच्या कथासंग्रहांचे वाङ्मयीन मूल्यमापन.

<u>प्रकरण सहावे</u>

निष्कर्ष आणि उपसंहार.

परिशिष्टः

अ) मूळ आधारभूत ग्रंथसूची(कथा)
आ) संदर्भ ग्रंथसूची
इ) साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक, नियतकालिक
ई) संकेतस्थळ
उ) विविध कोश/खंड
ऊ) प्रातिनिधिक मुलाखती

प्रकरण पहिले

स्त्रीलिखित मराठी कथा: एक आढावा

१.१ मराठी कथेचा इतिहास

१.२ कथा वाङ्मय प्रकाराचे स्वरूप(व्याख्या, घटक, विशेष)

१.३ मराठी कथेची परंपरा

१.४ स्त्रीलिखित मराठी कथा

१.५ मराठवाड्यातील स्त्रीलिखित मराठी कथा

प्रकरण दुसरे

मराठवाड्यातील कथा लेखिकांचा व्यक्तित्त्व-वेध

प्रस्तुत प्रकरणांमध्ये विषयाची मांडणी करत असताना पाच भागांमध्ये विभागणी केली आहे. यात कथा लेखिकांचा जन्म, बालपण, शिक्षण, विविध विचारप्रवाहांचा त्यांच्यावरील प्रभाव, साहित्यसंपदा कार्य व एकूणच व्यक्तिमत्त्वचा वेध घेतला जाईल.पहिल्या भागामध्ये प्रा. ललिता गादगे, दुसऱ्या भागामध्ये रेखा बैजल, तिसऱ्या भागामध्ये डॉ. छाया महाजन, चौथ्या भागामध्ये अनुराधा वैद्य व पाचव्या भागामध्ये मथु सावंत या लेखिकांचा व्यक्तित्त्ववेध घेतला जाईल.

प्रकरण तिसरे

मराठवाड्यातील लेखिकांच्या कथेतील अनुभवविश्व

१.१ प्रा. ललिता गादगे यांच्या कथेतील अनुभवविश्व

१.२ रेखा बैजल यांच्या कथेतील अनुभवविश्व

१.३ डॉ. छाया महाजन यांच्या कथेतील अनुभवविश्व

१.४ अनुराधा वैद्य यांच्या कथेतील अनुभवविश्व

१.५ मधु सावंत यांच्या कथेतील अनुभवविश्व

प्रकरण चौथे

मराठवाड्यातील लेखिकांच्या लेखनातून प्रतिबिंबीत स्त्रियांच्या जीवन संघर्षाचे स्वरूप, समस्या आणि उपाययोजना

४.१ आर्थिक संघर्ष

४.२ सामाजिक संघर्ष

४.३ राजकीय संघर्ष

४.४ शैक्षणिक संघर्ष

४.५ कौटुंबिक संघर्ष

४.६ उपाययोजना

प्रकरण पाचवे

मराठवाड्यातील लेखिकांच्या कथासंग्रहांचे वाङ्मयीन मूल्यमापन.

५.१ कथानक

५.२ व्यक्तिचित्रण

५.३ निवेदनशैली

५.४ वातावरण निर्मिती

५.५ घटना प्रसंग

५.६ संवाद

५.७ भाषाशैली

या घटकांच्या आधारे निवडलेल्या लेखिकांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन केले जाईल.

प्रकरण सहावे

निष्कर्ष आणि उपसंहार.

‘मराठवाड्यातील निवडक लेखिकांच्या कथासंग्रहात चित्रित स्त्रीजीवन: एक चिकित्सक अभ्यास' या प्रस्तुत विषयासंदर्भात शोधप्रबंधामध्ये प्रत्येक प्रकरणामध्ये केलेले संशोधन आणि संशोधनांती काढलेले निष्कर्ष यांची तपशीलवारपणे मांडणी या प्रकरणात केली जाणार आहे. मराठी कथेचे स्वरूप, मराठवाड्यातील कथा लेखिकांचा व्यक्तित्त्व वेध, मराठवाड्यातील कथालेखिकांच्या कथेतील आशय आणि अभिव्यक्तीचे स्वरूप, मराठवाड्यातील लेखिकांच्या कथेतील जीवनजाणिवा, मराठवाड्यातील लेखिकांच्या कथासंग्रहांचे वाङ्मयीन मूल्यमापन अशा पहिल्या प्रकरणापासून ते शेवटच्या प्रकरणापर्यंतचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला जाईल.

: परिशिष्ट :

परिशिष्ट अ :१. मूळ आधारभूत ग्रंथ सूची (कथासंग्रह)

अ.क्र.	कथासंग्रहाचे शीर्षक	लेखिकेचे नाव	प्रकाशन वर्ष
१	आयुष्याच्या काठाकाठाने	प्रा.ललिता गादगे	१९९१
२	दुःख आणि अश्रू.	प्रा.ललिता गादगे	१९९५
३	प्राजक्ताची फुले आणि दाह	प्रा.ललिता गादगे	२००२
४	मानस	रेखा बैजल	
५	शिवार	रेखा बैजल	
६	स्पंदन	रेखा बैजल	
७	स्वप्नस्थ	रेखा बैजल	
८	एकादश कथा	डॉ. छाया महाजन	
९	ओढ	डॉ. छाया महाजन	
१०	राहिलो उपकारापुरता	डॉ. छाया महाजन	
११	स्पर्श	डॉ. छाया महाजन	
१२	काजळ	अनुराधा वैद्य	
१३	प्रवाह	अनुराधा वैद्य	२०००
१४	कबंध	अनुराधा वैद्य	२००३
१५	जन्म मृत्यूचे भातुके	अनुराधा वैद्य	२००५
१६	पाण्यातील पायवाट	मथु सावंत	१९९१
१७	तिची वाटच वेगळी	मथु सावंत	२०००
१८	पाणबळी	मथु सावंत	२००६

याशिवाय प्रस्तुत शोधप्रबंधाचे संशोधन कार्य पूर्ण करत असताना संशोधनकर्त्याला स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण करणारे प्रस्तुत लेखिकांचे इतर काही कथासंग्रह मिळाले तर त्यांचाही या संशोधन कार्यात समावेश करणार आहे.

संदर्भ:१. संदर्भग्रंथ सूची:

०१. साहित्य संशोधनाच्या नव्या दिशा	डॉ. गावकर अविनाश
०२. संशोधन सिद्धांत आणि पद्धती	क-हाडे स.दा.
०३. संशोधन: स्वरूप व दिशा .	डॉ. चुनेकर सु.रा.
०४. भारतीय स्त्रीजीवन	साने गीता
०५. हिंदू संस्कृती आणि स्त्री	साळुंखे आ.ह.
०६. भारतीय संदर्भातून स्त्रीवाद	नाईक शोभा
०७. स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन	महाजन वंदना
०८. स्त्री प्रश्नांची चर्चा	रानडे प्रतिभा
०९. स्त्रियांची आत्मचरित्रे	पाटील शोभा
१०. मराठी साहित्य संशोधन: स्वरूप आणि दिशा	डॉ. राणे श.रा.
११. संशोधन पद्धती	डॉ. संत दु.का.
१२. सामाजिक संशोधन पद्धती	डॉ. बी.एम. क-हाडे
१३. शोधनिबंधाची लेखन पद्धती	डॉ. मालसे स.ग.

टीप: सदरील संशोधन आराखड्यात संशोधनाला गती येईल त्याप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी बदल होणे संभवणीय आहे.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुनीता सांगोले

एम.ए.(मराठी) सेट.पीएच.डी.

दयानंद महाविद्यालय, लातूर.

संशोधक

सोनवणे सुलक्षणा ज्ञानदेव

एम.ए.(मराठी) सेट, एम.एड.